सामना

७ पिंपरी-परिसर

मंगळवार, दि. ५ डिसेंबर २०१७

# 'शाळांगण' प्रकल्पांतर्गत विद्यार्थिनींनी गिरविले स्वसंरक्षणाचे धडे

मुलींची होणारी छेडछाड, रॅगिंग, विनयभंग याबाबत घ्यावयाची काळजी, त्यावरील उपाय, त्यासाठीचे विविध कायदे आदी स्वसंरक्षणासाठी विविध धडे विद्यार्थिनींनी गिरविले. निमित्त होते, 'शाळांगण' प्रकल्पाचे. 'पंख' संस्था आणि क्विक हील फाऊंडेशन व रयत शिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. पिंपरीतील नवमहाराष्ट्र विद्यालय येथे पार पडलेल्या या 'शाळांगण' प्रकल्पांतर्गत मुला-मुलींसाठी जाणीव-जागृती कार्यक्रम घेण्यात आला. पोलीस उपनिरीक्षक रत्ना सावंत, पवन पाटील, 'पंख' संस्थेच्या अध्यक्षा स्मिता आपटे, विश्वस्त सीमा ननवरे, क्विक हील फाऊंडेशनचे सीएसआर प्रमुख अजय शिर्के, मुलांच्या नवमहाराष्ट्र विद्यालयाचे मुख्याध्यापक उत्तमराव पाटील, मुलींच्या नवमहाराष्ट्र विद्यालयाच्या मुख्याध्यापिका शारदा जाधव आदी यावेळी उपस्थित होते. पोलीस उपनिरीक्षक रत्ना सावंत, पवन पाटील यांनी मुलांना छेडछाड, विनयभंग यासंबंधीच्या कायद्यांबाबत माहिती दिली. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या विविध प्रश्नांना त्यांनी उत्तरे दिली.